# प्रकरण चौथे

## संकलित तथ्यांचे स्पष्टीकरण आणि विश्लेषण


४.१ प्रास्ताविक

४.२ बाजारातील नियमित शेतमाल

४.३ बाजार समितीचे उत्पन्न

  ४.३.१ बाजार अभिकर्त्ये

  ४.३.२ बाजार आकार

  ४.३.३ इतर मार्गांनी मिळणारे उत्पन्न

  ४.३.४ एकूण उत्पन्न

४.४ कर्ज व अनुदाने

४.५ बाजार समितीचा खर्च

  ४.५.१ कार्यालयीन खर्च

  ४.५.२ इतर खर्च

  ४.५.३ एकूण खर्च

४.६ वडूज बाजार समितीचा निव्वळ नफा

४.७ कायम स्वरुपाचा निधी

४.८ बाजारातील शेतमालाची आवक

४.९ शेतमालाच्या बाजारातील किंमती

४.१० प्रतवारी

४.११ वाहतूक सुविधा

४.१२ शेतमालाचे वजन

४.१३ गोदाम व्यवस्था

४.१४ जाहिरात

४.१५ जनावरांचे खरेदी-विक्री व्यवहार

# प्रकरण चौथे

## संकलित तथ्यांचे स्पष्टीकरण आणि विश्लेषण

### ४.१ प्रास्ताविक :

या अगोदरच्या प्रकरणामध्ये कृषि विपणन व्यवस्था, नियंत्रित बाजाराची उद्दिष्टये, अभ्यासाची पध्दती, खटाव तालुक्याची आर्थिक व सामाजिक रुपरेषा आणि वडूज कृषि उत्पन्न बाजार समितीची स्थापना या घटकांचा सविस्तर विचार केलेला आहे. सदरच्या प्रकरणात संशोधकाने जमा केलेली माहिती, तथ्ये व आकडेवारी ज्या हेतूंनी जमा केलेली आहे, त्याचे साध्या संख्याशास्त्रीय पध्दतीचा अवलंब करुन स्पष्टीकरण आणि विश्लेषण करण्यात आलेले आहे.

### ४.२ बाजारातील नियमित शेतमाल :

बाजार नियमनाचा अवलंब करणे हे वडूज कृषि उत्पन्न बाजार समितीचे पहिले आणि महत्वाचे कार्य आहे. नियमित शेतमाल यामध्ये गूळ, घेवडा, ज्वारी, बाजरी, भुईमूग, गहू, हळद, अशा विविध शेतमालाचा समावेश सरकारी आदेशानुसार होतो. तसेच जनावरांच्या बाजारालासुध्दा हा कायदा लागू पडतो.

कोष्टक क्रमांक ४.१ मध्ये वडूज बाजार समितीला नियमित शेतमालाचा शासकीय मान्यता मिळालेल्या घटकांची सविस्तर माहिती स्पष्ट केलेली आहे.

कोष्टक क्र. ४.१

वडूज बाजार समितीतील नियमित शेतमाल

| अनु. | तपशील | सरकारी आदेश |
|---|---|---|
| १) | गूळ, भुईमूग (फोडलेला, न फोडलेला) ज्वारी, बाजरी, धने, हरभरा, तूर, गहू, मिरची, चक्की, बटाटा, मूग, हळद, उडीद, गुरे, बकरे, मेंढरे | एपीएम-५८ दि. १-८-१९६५ |
| २) | कापूस, लोकर, कांदा, घेवडा, लसूण. | सीएमआर-आर-१२-६९ दि. १६-७-१९६९ |

संदर्भ : कृषि उत्पन्न बाजार समिती, वडूज माहिती आधारे.

या कोष्टकावरून असे सूचित होते की, १९६५ मध्येच वडूज बाजार समितीला नियमित शेतमाल म्हणून १७ वस्तूंना शासकीय मान्यता दिलेली आहे. त्यानंतर १९६९ मध्ये पुन्हा ५ शेती उत्पादित वस्तूंना नियमित शेतमाल विपणनाचा सरकारी परवाना मिळाला आहे. एकूण २२ वस्तूंच्या खरेदी विक्रीचे व्यवहार वडूज बाजार आवारात होत आहेत.

याशिवाय १९८८-८९ मध्ये बाजार समितीने भात, डाळी, साखर, आले, खाद्यतेल या शेती उत्पादित वस्तूंची नियमित शेतमाल यासाठी शासनाकडे मागणी केलेली आहे.

## ४.३ बाजार समितीचे उत्पन्न :

बाजार समितीच्या उत्पन्नाचे महत्वाचे मार्ग यामध्ये परवाना शुल्क आणि बाजार शुल्क यांचा समावेश होतो. याशिवाय इतर मार्गांनी समितीला उत्पन्न प्राप्त होते. यात गोदाम भाडे, प्लॉटचे भाडे, जनावरांच्या खरेदी-विक्री व्यवहारातून कर ह्याने मिळणारे उत्पन्न, इत्यादी. वडूज कृषि उत्पन्न बाजार समितीला १९७५-७६ ते १९८८-८९ या कालावधी प्राप्त झालेल्या उत्पन्नाचा आढावा खालील घटकांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

### ४.३.१ बाजार अभिकर्त्ये :

बाजार समितीतील दुसरा महत्वाचा घटक म्हणजे बाजार अभिकर्त्ये किंवा परवानाधारक होय. त्यात प्रामुख्याने अ, ब, क वर्ग व्यापारी, दलाल, अ, ब वर्ग प्रक्रिया करणारे, मापाडी, हमाल, भांडार गृहरक्षक, आडते, वखारवाला इत्यादींचा समावेश होतो. परवानाधारकांच्या सहाय्याने विपणनाची प्रक्रिया पूर्ण केली जाते. शेती उत्पादन बाजारची वडूज बाजार समितीच्या उपविधी क्रमांक ४(२) नुसार बाजार आवारात शेती उत्पादनाची खरेदी विक्री व अन्य संबंधात व्यवहार करू इच्छिणाऱ्या महाराष्ट्र शेती उत्पन्न विपणन अधिनियम १९६७ मधील नियम क्रमांक ६ व ७ च्या अनुषंगाने खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे बाजाराच्या प्रत्येक वर्गासाठी अनुज्ञप्ति शुल्कची संपूर्ण रक्कम अर्जासोबत बाजार समितीकडे भरून परवाना घ्यावा लागतो.

तक्ता क्र. ४.२

अनुज्ञप्ति शुल्काचे दर

| अनु. | अनुज्ञप्तिचा प्रकार | अनुज्ञप्तिचा वार्षिक दर (रूपये) | नुतनीकरणाचा दर (रूपये) |
|---|---|---|---|
| १. | आडत्या | १०० | १०० |
| २. | अ वर्ग व्यापारी | १०० | १०० |
| ३. | ब वर्ग व्यापारी | ७५ | ७५ |
| ४. | क वर्ग व्यापारी | ३५ | ३५ |
| ५. | ड वर्ग व्यापारी | २५ | २५ |
| ६. | अ वर्ग प्रक्रिया करणार | १०० | ९० |
| ७. | ब वर्ग प्रक्रिया करणार | ५० | ४५ |
| ८. | क वर्ग प्रक्रिया करणार | २० | १५ |
| ९. | सर्वेदाक | १५ | १५ |
| १०. | तोलणार-मापणार | १० | १० |
| ११. | गाडीभाडे व वटवणी-अभिकर्त्या | २० | २० |
| १२. | मदतनीस | ५ | ५ |
| १३. | गुदामधारक | ३ | ३ |
| १४. | वखारवाला | १५ | १५ |
| १५. | हमाल | ३ | ३ |
| १६. | गाडीवान | १० | १० |
| १७. | मोटार ट्रक ड्रायव्हर-मालक | २० | २० |

संदर्भ : कृषि उत्पन्न बाजार समिती, वडूजच्या माहिती आधारे.

या अनुज्ञप्ति शुल्काच्या स्वरूपात बाजार समितीला लक्षणीय अशी प्राप्ती होत राहिली आहे. समितीस या मार्गाने १९७५-७६ मध्ये २०,२७० रूपये मिळाले तर १९८८-८९ मध्ये ही रक्कम ६१,१५३ रूपयांपर्यन्त वाढल्याचे तक्ता क्रमांक ४.३ वरून लक्षात येते. वाढत्या व्यापारा बरोबर व्यापाऱ्यांची तसेच

बाजारातील इतर प्रकारच्या अनुज्ञप्ति धारकांची संख्या कमी-अधिक झालेली आहे. अनुज्ञप्ति धारकांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर चढउतार झालेले आहेत. त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

तक्ता क्र. ४.३

वडूज बाजार समितीस मिळालेले अनुज्ञप्ति शुल्क

| अनु. | वर्ष | अनुज्ञप्ति शुल्क (रुपये) |
|---|---|---|
| १. | १९७५-७६ | २०२८६ |
| २. | १९७६-७७ | २२६२२ |
| ३. | १९७७-७८ | ३०५३५ |
| ४. | १९७८-७९ | ३१३२९ |
| ५. | १९७९-८० | ३६३८२ |
| ६. | १९८०-८१ | ५३३७० |
| ७. | १९८१-८२ | ५५०६५ |
| ८. | १९८२-८३ | ६०२६२ |
| ९. | १९८३-८४ | ५८१३२ |
| १०. | १९८४-८५ | ५९७७४ |
| ११. | १९८५-८६ | ५७९६२ |
| १२. | १९८६-८७ | ६११६६ |
| १३. | १९८७-८८ | ६१३६१ |
| १४. | १९८८-८९ | ६११५३ |

संदर्भ : वडूज बाजार समिती, वार्षिक अहवाल १९७५-७६ ते १९८८-८९.

अनुज्ञप्ति शुल्कापासून वडूज बाजार समितीला मिळणाऱ्या उत्पन्नाचा तपशील कोष्टक क्रमांक ४.३ मध्ये स्पष्ट केलेला आहे.

१९७५-७६ मध्ये वडूज बाजार समितीला अनुज्ञप्ति शुल्कापासून २०,२८६ रुपये उत्पन्न प्राप्त झालेले होते त्यात वाढ होऊन १९८८-८९ या वर्षी ते ३,६१,१५३ रूपयांचे झाले. या कालावधीत या उत्पन्नात निव्वळ वाढ ४०,८६७ क रूपयांनी झालेली आहे. ही वाढ ६६.४२ टक्के आहे. प्रत्येक वर्षी सरासरी १४.३८ टक्क्यांनी अनुज्ञप्ति शुल्क वाढलेले आहे.

विश्लेषण काळात अनुज्ञप्तिपासून मिळणारे उत्पन्न वाढत असले तरी एकूण उत्पन्नातील त्याचा हिस्सा वाढलेला दिसून येत नाही.

१९७५-७६ ते १९८८-८९ या कालावधीत या प्रमाणात कमीतकमी १०.०१ टक्के पासून जास्तीतजास्त २६.७८ टक्केपर्यन्त वाढ झालेली आहे. या कालावधीतील निव्वळ वाढ १६.७७ टक्के इतकी आहे.

यावरून असे सूचित होते की, वडूज बाजार समितीला अनुज्ञप्ति फी पासून मिळणाऱ्या उत्पन्नात विश्लेषण काळात वाढ झालेली आहे. परंतु एकूण उत्पन्नाशी अनुज्ञप्ति फीचे प्रमाण बाजार फीशी तुलना केल्यास कमी असल्याचे जाणवते.

४.३.२ <u>बाजार आकार</u> :

१९६३ च्या महाराष्ट्र शेती उत्पन्नाची खरेदी विक्री (नियमन) अधिनियम या कायद्यानुसार बाजार आकारांची रचना, मर्यादा आणि संख्या निश्चित करण्यात आलेली आहे. या नियम, उपनियमांच्या आधारे वडूज कृषि उत्पन्न बाजार समिती कृषि विपणन प्रक्रियेत विविध घटकांना उपलब्ध केलेल्या सेवा-सुविधांची फी वसूल करते. बाजार फीमध्ये दलाली, हमाली, शिलाई, वजन करण्याचा खर्च (तोलाई) प्रवेश कर यांचा समावेश होतो.

' बाजार फी ' हा बाजार समितीला उत्पन्न मिळविण्याचा एक महत्वाचा मार्ग आहे. समितीच्या एकूण उत्पन्नात बाजार फीचा वाटा सर्वाधिक राहतो. बाजार फीमध्ये वाढ झाल्याने बाजार समितीच्या उत्पन्नात वाढ होत असल्याचे स्पष्ट होते.

खालील तक्त्यात बाजार समिती शेतकरी, व्यापारी, उत्पादक यांच्याकडून कोणते आकार वसूल करते त्याचा उल्लेख केलेला आहे.

तक्ता क्र. ४.४

वडूज बाजार समितीचे बाजार आकार

| अनु. | शेतमालाचे नाव | बाजार आकाराचा प्रकार | परिमाण | दर | कोणाकडून |
|---|---|---|---|---|---|
| १) | भुईमूग (फोडलेला-न फोडलेला) गूळ, ज्वारी, बाजरी, धना, हरभरा, तूर, गहू, मिरची, मूग, चवळी, हळद, बटाटा, कांदा, उडीद, कापूस, लसूण, लोकर घेवडा | कमिशन | १०० रु.च्या मालाच्या किंमतीवर | २-०० | विक्रेत्याकडून |
| | | तोलाई | प्रती क्विंटल | ०-५० | ,, |
| | | हमाली | ,, | ०-७५ | ,, |
| | | गोदाम भाडे | प्रत्येक पोत्यास दरमहा | ०-१५ | ,, |
| | | | १०० थैलीस दरमहा | २-५० | |
| | | चाळण | प्रत्येक पोत्यास | ०-२५ | ,, |
| | | थप्पी मारणे | ,, | ०-२५ | ,, |
| | | | प्रत्येक थैलीस | ०-०२ | ,, |
| | | शिक्का | प्रत्येक पोत्यास | ०-०५ | खरेदीदाराकडून |
| | | मारणे | प्रत्येक थैलीस | ०-०५ | ,, |
| | | शिलाई | प्रत्येक पोत्यास | ०-०५ | ,, |
| | | | प्रत्येक थैलीस | ०-०५ | ,, |
| २) | जनावरे व शेळ्या मेंढया | दलाली | किंमत रु. १०० पर्यन्त | ०-७५ | खरेदीदार किंवा व्यापारी यांच्या- तर्फे दलालाने काम केलेले असेल त्याचेकडून |
| | | | १०१ ते २०० पर्यन्त | १-५० | |
| | | | रु. २०० चे पुढे प्रत्येक १०० रुपयास | ०-२५ | |

संदर्भ : वडूज कृषि उत्पन्न समिती माहिती आधारे.

वडूज बाजार समितीच्या एकूण उत्पन्नातील सर्वाधिक हिस्सा बाजार शुल्काचा असल्याचे आढळून येते. प्रामुख्याने १९७५-७६ ते १९८८-८९ या कालावधीतील बाजार शुल्कापासून मिळालेले उत्पन्न खालील कोष्टकात स्पष्ट केलेले आहे.

कोष्टक क्र. ४.५

वडूज बाजार समितीला बाजार शुल्कापासून मिळालेले उत्पन्न (रुपये)

| वर्ष | बाजार शुल्क (रुपये) |
|---|---|
| १९७५-७६ | ४६२१६ |
| १९७६-७७ | ५८९८० |
| १९७७-७८ | ७४०३७ |
| १९७८-७९ | ८२७५४ |
| १९७९-८० | १४१२३२ |
| १९८०-८१ | १६३९६४ |
| १९८१-८२ | १८७२९० |
| १९८२-८३ | २२१४७५ |
| १९८३-८४ | २५७३९२ |
| १९८४-८५ | २७८७९२ |
| १९८५-८६ | ३४९२०३ |
| १९८६-८७ | ३३१४९९ |
| १९८७-८८ | ३६४५६० |
| १९८८-८९ | ४१६१३६ |

संदर्भ : वडूज कृषि उत्पन्न बाजार समिती, वार्षिक अहवाल १९७५-७६ ते १९८८-८९.

सदरच्या कोष्टक क्र. ४.५ वरून स्पष्ट होते की १९७५-७६ मध्ये बाजार शुल्कापासून मिळणारे उत्पन्न ४६,२१६ रुपये होते. १९८८-८९ या वर्षी ४,१६,१३६ रुपयांपर्यन्त त्यात वाढ झाली. बाजार शुल्काच्या उत्पन्नात या कालावधीत ३,६९,९२० रुपयांनी निव्वळ नफा वाढ झालेली आहे. ही वाढ ८८.८९ टक्के असून या कालावधीत प्रत्येक वर्षी सरासरी ५७.१७ टक्के दराने बाजार शुल्कापासून मिळणाऱ्या उत्पन्नात वाढ झालेली आहे.

१९७५-७६ ते १९८८-८९ या कालावधीत बाजार शुल्कापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाण कमीतकमी ५४.२१ टक्केपासून जास्तीतजास्त ७२.४२ टक्के पर्यन्त वाढलेले आहे. या प्रमाणात झालेली निव्वळ वाढ १२.५४ टक्के इतकी आहे. सर्वात जास्त प्रमाण १९८५-८६ मध्ये असून ते ७२.४२ टक्के आहे तर सर्वात कमी प्रमाण १९८९-९० मध्ये असून ते ५४.२१ टक्के इतके आहे.

१९८६-८७ यावर्षी बाजार शुल्काचे प्रमाण कमी असण्याचे कारण याच वर्षी बाजार समितीला केंद्र शासनाकडून १ लाख रुपये अनुदान मिळाले. त्यामुळे बाजार समितीचे इतर मार्गांनी मिळालेले उत्पन्न २,१८,८४१ रुपये झाले. याचा परिणाम म्हणून एकूण उत्पन्नातील इतर बाबींपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा हिस्सा ३५.७४ टक्के पर्यन्त वाढला.

यावरून असे निदर्शनास येते की, बाजार समितीला बाजार शुल्क पासून सर्वाधिक उत्पन्न प्राप्त होते. १९७५-७६ ते १९८८-८९ या विश्लेषण काळात वगळून बाजार समितीला बाजार फीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा हिस्सा सरासरी ६० टक्क्यांपेक्षा अधिक आहे. थोडक्यात, बाजार फी हा कृषि उत्पन्न बाजार समितीच्या उत्पन्नाचा महत्वाचा मार्ग आहे.

४.३.३ इतर मार्गांनी मिळणारे उत्पन्न :

बाजार समितीला बाजार शुल्क व अनुज्ञप्ति शुल्क याशिवाय अन्य मार्गांनी मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश इतर मार्गांनी मिळणाऱ्या उत्पन्नात केलेला आहे. या बाबीपासून मिळणारे उत्पन्न कोष्टक क्र. ४.६ मध्ये दर्शविले आहे.

वडूज बाजार समितीला १९७५-७६ मध्ये या मार्गांनी मिळणारे उत्पन्न १०,६७९ रुपये होते. एकूण उत्पन्नाशी या उत्पन्नाचा हिस्सा १३.८४ टक्के होता. १९८८-८९ मध्ये बाजार समितीस या मार्गांनी मिळालेले उत्पन्न १,३३,९२२ रुपये पर्यन्त वाढले आणि एकूण उत्पन्नातील हिस्सा २१.८४ टक्के झाला. म्हणजे या विश्लेषण कालावधीत इतर मार्गांनी मिळालेल्या उत्पन्नात निव्वळ वाढ १,२३,२४३ रुपयांनी झालेली आहे. प्रत्येक वर्षी सरासरी ८४.८१ टक्के दराने उत्पन्न वाढलेले आहे.

विश्लेषण काळात इतर मार्गांनी मिळणारे उत्पन्न सर्वात जास्त १९८६-८७ या वर्षी असून ते २,१८,८४१ रुपये होते. या वर्षी या उत्पन्नाचे एकूण उत्पन्नाशी असलेले प्रमाण ३५.७४ टक्के होते. या वर्षी इतर मार्गांनी मिळालेले उत्पन्न सर्वाधिक असण्याचे कारण, वडूज बाजार समितीला राज्य सरकारकडून १,००,००० रुपये अनुदान प्राप्त झाले. त्यामुळे इतर मार्गांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाची रक्कम तुलनेने वाढली.

४.३.४ एकूण उत्पन्न :

बाजार समितीच्या एकूण उत्पन्नात बाजार शुल्क अनुज्ञप्ति शुल्क व इतर मार्गांनी मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश होतो. वडूज कृषि उत्पन्न बाजार समितीच्या एकूण उत्पन्नातील बदल कोष्टक क्रमांक ४.६ मध्ये स्पष्ट केलेला आहे.

विश्लेषण काळात १९७५-७६ मध्ये बाजार समितीचे एकूण उत्पन्न ७७,९८१ रुपये होते. ते १९८८-८९ मध्ये ६,११,२११ रुपये पर्यन्त वाढले. या कालावधीत बाजार समितीच्या एकूण उत्पन्नात ५,३४,०३० रुपयांची निव्वळ वाढ झाली. ही वाढ ८३.३७ टक्के झालेली आहे. प्रत्येक वर्षी सरासरी ४९.४२ टक्के दरांनी एकूण उत्पन्नात वाढ झालेली आहे. या उत्पन्नाच्या वाढीत १९८५-८६ आणि १९८७-८८ ही अपवाद वर्षे वगळता इतर वर्षे झाढ झालेचे दिसून येते. १९८८-८९ मध्ये एकूण उत्पन्न ६,११,२११ रुपयांचे होते. १९८७-८८ च्या तुलनेने या उत्पन्नात वाढ झाली कारण या वर्षी शासनाकडून बाजार समितीस १ लाख रुपये अनुदान प्राप्त झाले. १९८७-८८ या वर्षी मागील वर्षाच्या तुलनेने शेतमालाची आवक कमी झाली, पर्यायाने शेतमालाचे पैशातील मुल्य घटले यामुळे बाजार समितीला ५,१४,९६९ रुपये उत्पन्न मिळाले. ते मागील वर्षाशी तुलना केल्यास घटलेले दिसून येते.

तक्ता क्र. ४.६

बाजार समितीच्या उत्पन्नातील विविध घटकांचे
शेकडा प्रमाण (१९७५-७६ ते १९८८-८९)

| वर्ष | अनुज्ञप्ति फी | बाजार फी | इतर मार्गांनी मिळणारे उत्पन्न | एकूण उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १९७५-७६ | २०२८६<br>(२६.२८) | ४६२१६<br>(५९.८८) | १०६७९<br>(१३.८४) | ७७९८१<br>(१००.००) |
| १९७६-७७ | २२६२२<br>(२४.५२) | ५८९८०<br>(६३.९४) | १०६३७<br>(११.५४) | ९२२३९<br>(१००.००) |
| १९७७-७८ | ३०५३५<br>(२६.७८) | ७४०३७<br>(६४.९४) | ९४२६<br>(०८.२८) | ११३९९८<br>(१००.००) |
| १९७८-७९ | ३१३२९<br>(१०.०१) | ८२७५४<br>(६२.३३) | १८६७९<br>(२७.६६) | १३२७५२<br>(१००.००) |

तक्ता क्र. ४.६ (पुढे चालू...)

| १. | २. | ३. | ४. | ५. |
|---|---|---|---|---|
| १९७९-८० | ३६३८२ (१८.०६) | १४१२३२ (७०.०१) | २४१०४ (११.९३) | २०१७९८ (१००.००) |
| १९८०-८१ | ५३३७० (२२.९३) | १६३९६४ (७०.४४) | १५४१६ (०६.३३) | २३२७५० (१००.००) |
| १९८१-८२ | ५५०६५ (१८.१४) | १८७२९० (६१.७०) | ६११६५ (२०.१६) | ३०३५२० (१००.००) |
| १९८२-८३ | ६०२६२ (१६.२४) | २२१४७५ (५९.७०) | ८९२२४ (२४.०६) | ३७०९६१ (१००.००) |
| १९८३-८४ | ५८१३२ (१२.७९) | २५७३९२ (५६.६७) | १३८६६१ (३०.५४) | ४५४१८५ (१००.००) |
| १९८४-८५ | ५९७७४ (११.८२) | २७८७९२ (५५.१६) | १६६७७६ (३३.०२) | ५०५३४२ (१००.००) |
| १९८५-८६ | ५७९६२ (१२.०२) | ३४९२०३ (७२.४२) | ७४९८३ (१५.५६) | ४८२१४८ (१००.००) |
| १९८६-८७ | ६११६६ (१०.०५) | ३३१४९९ (५४.२१) | २१८८४१ (३५.७४) | ६११५०६ (१००.००) |
| १९८७-८८ | ६१३६१ (११.९१) | ३६४५६० (७०.७९) | ८९०४८ (१७.०३) | ५१४९६९ (१००.००) |
| १९८८-८९ | ६११५३ (१०.०५) | ४१६१३६ (६८.०८) | १३३९२२ (२१.८७) | ६११२११ (१००.००) |

संदर्भ : वडूज कृषि उत्पन्न बाजार समिती, वार्षिक अहवाल.

टीप : कंसातील आकडे त्या उत्पन्नाचे एकूण उत्पन्नाशी असलेले शेकडा प्रमाण दर्शवितात.

४.४ कर्जे व अनुदाने :

वडूज कृषि उत्पन्न बाजार समिती ही ग्रामीण आणि दुष्काळी भागात कार्य करणारी संस्था असल्यामुळे अन्य समित्याप्रमाणे मोठ्या प्रमाणावर

उत्पन्न प्राप्त होत नाही. त्याशिवाय मोठया प्रमाणात विपणन विषयक सेवा-सुविधा, गुंतवणूक, विकास याला मर्यादा येतात. अशावेळी बाजार समितीने विकासाकरिता भारतीय स्टेट बँक, शाखा वडूज कडून कर्जे घेतलेली आहेत, तसेच कर्जाची ठरल्याप्रमाणे व्याजासह परतफेड नियमितपणे केलेली आहे.

केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांचेकडून वडूज बाजार समितीच्या कार्यातील अडथळे कमी व्हावेत या दृष्टिकोनातून अन्य समित्यांप्रमाणे काही अनुदाने प्राप्त झालेली आहेत. यामुळे समितीने विकास कामे पूर्ण केलेली आहेत. यात प्रामुख्याने इमारती, गोदामे, पाण्याची व्यवस्था यांचा समावेश होतो.

वडूज बाजार समितीस मिळालेले कर्जे व अनुदाने याचा उल्लेख खालील तक्ता क्रमांक ४.७ मध्ये केलेला आहे.

<u>तक्ता क्र. ४.७</u>

<u>वडूज बाजार समितीने घेतलेले कर्ज व अनुदान</u>

(१९७५-७६ ते १९८८-८९ पर्यन्त)

| वर्ष | कर्ज (रुपये) | अनुदान (रुपये) |
|---|---|---|
| १९७५-७६ | - | - |
| १९७६-७७ | १०,००० | २५,००० |
| १९७७-७८ | १००,००० | - |
| १९७८-७९ | ५०,००० | - |
| १९७९-८० | - | - |
| १९८०-८१ | ४०,००० | - |
| १९८१-८२ | - | - |
| १९८२-८३ | २५,००० | २५,००० |
| १९८३-८४ | - | - |
| १९८४-८५ | - | - |

तक्ता क्र. ४.७ (पुढे चालू...)

| वर्ष | कर्ज (रुपये) | अनुदान (रुपये) |
|---|---|---|
| १९८५-८६ | ५०,००० | १,००,००० |
| १९८६-८७ | - | १,००,००० |
| १९८७-८८ | ५०,००० | ५०,००० |
| १९८८-८९ | - | १,००,००० |
| एकूण : | ३,२५,००० | ४,००,००० |

संदर्भ : वडूज बाजार समिती, माहितीच्या आधारे.

सदरच्या तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, वडूज बाजार समितीने १९७६-७६ ते १९८८-८९ या कालावधीत सुमारे ३,२५,००० रुपये कर्जाची उभारणी केलेली आहे आणि याच कालावधीत ४,००,००० रुपयांच्या अनुदानाचा विनियोग विकास कार्यावर केलेला आहे.

कर्ज रक्कमेपैकी १९८८-८९ अखेर ५०,००० रुपयांची परतफेड करणे बाकी आहे. थोडक्यात बाजार समितीस १९७५-७६ ते १९८८-८९ या काळात सुमारे ३२,५००० रुपये कर्जाऊ आणि ४,००,००० रुपये अनुदानाच्या स्वरूपात प्राप्त झालेले आहेत.

४.५ वडूज बाजार समितीचा खर्च :

बाजार समितीचा खर्च अगदी दक्षतापूर्वक करण्यात येतो. प्रामुख्याने विकासकार्यावर पूर्वनियोजितपणे खर्च करण्यात येतो. बाजार समितीच्या खर्चाचे कार्यालयीन खर्च आणि इतर खर्च असे प्रकार मानले जातात.

४.५.१ कार्यालयीन खर्च :

प्रत्येक बाजार समितीला व्यवस्थापन चालविण्यासाठी अनेक घटकांवर खर्च करावा लागतो. त्यात प्रामुख्याने कर्मचारी वर्गांना देण्यात येणारे वेतन, महागाई भत्ता, इत्यादी घटकांचा समावेश होतो. वडूज कृषि उत्पन्न बाजार समितीच्या कार्यालयीन खर्चाचे स्पष्टीकरण कोष्टक क्रमांक ४.८ मध्ये दिलेले आहे.

१९७५-७६ ते १९८८-८९ या कालावधीत वडूज बाजार समितीचा कार्यालयीन खर्च २४,८९० रुपयांपासून ते २६६१८३ रुपयांपर्यन्त वाढला आहे. या खर्चात झालेली निव्वळ वाढ २,४१,२९३ रुपयांची आहे. ही वाढ ९०.६४ टक्के इतकी आहे. या कालावधीत प्रत्येक वर्षी सरासरी ६९.२४ टक्के दरांनी वाढ झालेली आहे. विश्लेषण कालावधीत सर्वात अधिक कार्यालयीन खर्च १९८८-८९ मध्ये एकूण खर्चाशी तुलना करता ५६.१५ टक्के इतका आहे. तर सर्वात कमी खर्च १९८३-८४ मध्ये ३४.२६ टक्के इतका आहे. या कालावधीत या खर्चाच्या प्रमाणात २१.८९ टक्के निव्वळ वाढ झालेली आहे.

यावरून असे निदर्शनास येते की, १९७५-७६ ते १९८८-८९ या विश्लेषण कालावधीत कार्यालयीन खर्चात वाढ झालेली आहे. परंतु एकूण खर्चाशी कार्यालयीन खर्चाचे असलेले प्रमाण कमी आहे.

४.५.२ इतर खर्च :

कृषि उत्पन्न बाजार समितीच्या इतर खर्चात प्रामुख्याने सभासद व चेअरमन, व्हाईस चेअरमन यांना द्यावे लागणारे मानधन, प्रवास भत्ता यांचा समावेश होतो तसेच प्रशासकीय खर्चात नवनवीन योजना (प्लॅन्स) दूरध्वनी, वृत्तपत्रे, नियतकालिके, पोशाख, छपाई, लेखनसामुग्री, डाक व तार, मुद्रांक, भेटी व समारंभ, जाहिरात, करभरणा, निवडणूक, महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ वर्गणी आणि अन्य किरकोळ खर्च या बाबीचा समावेश होतो.

वडूज कृषि उत्पन्न बाजार समितीने इतर बाबींवर केलेला खर्च आणि या खर्चात झालेला बदल कोष्टक क्रमांक ४.८ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

वडूज कृषि उत्पन्न बाजार समितीकडून सभासदांना देण्यात येणारे मानधन व भत्ता पुढीलप्रमाणे :

बाजार समितीच्या चेअरमन (सभापती) यांना दरमहा ४०० रुपये मानधन आणि व्हाईस चेअरमन (उपसभासपती) यांना दरमहा २०० रुपये मानधन देण्यात येते. इतर सभासदांना सभा भत्याशिवाय कोणतेही मानधन दिले जात नाही.

<u>सभासदांना द्यावयाच्या भत्यासंबंधी</u> -

वडूज कृषि उत्पन्न बाजार समितीच्या उपनियमाप्रमाणे आणि सरकारी मान्यतेवरून बाजार समितीच्या सभांना हजर राहण्यासाठी किंवा कामकाजासंबंधी प्रवास करावा लागल्यास सदस्यांना खालीलप्रमाणे भत्ते दिले जातात.

१) प्रवास भत्ता -

१.१) रेल्वे प्रवास - पहिल्या वर्गाचे भाडे.

१.२) एस.टी.ने प्रवास - एस.टी.चे दिडपट भाडे.

१.३) स्वत:च्या स्वयंचलित दुचाकी वाहनाने प्रवास - एस.टी.चे दिडपट भाडे

१.४) अन्य वाहनाने प्रवास - रेल्वे दिडपट भाडे व रेल्वे नसल्यास एस.टी.चे दुप्पट भाडे

(हा प्रवास खर्च सभासदांच्या राहत्या ठिकाणापासून बाजार समितीच्या सभेच्या ठिकाणापर्यन्त देण्यात येतो.)

२) दैनिक भत्ता -

| | | |
|---|---|---|
| २.१) | बाजार क्षेत्रात प्रवास केल्यास - | रु. २५-०० |
| २.२) | बाजार क्षेत्राच्या बाहेर महाराष्ट्र राज्यात कोठेही मात्र महानगर पालिका हद्दीखेरीज - | रु. २५-०० |
| २.३) | महाराष्ट्र राज्यात महानगर-पालिका हद्दीत व महाराष्ट्र राज्याबाहेर कोठेही - | रु. ४०-०० |

३) सभा उपस्थिती भत्ता -

| | | |
|---|---|---|
| ३.१) | प्रत्येक सभेबद्दल - | रु. २५-०० |
| ३.२) | बाजार समितीच्या सभापतींना दरमहा कायमस्वरूपी सभा उपस्थित भत्ता - | रु. १२५-०० |

वडूज कृषि उत्पन्न बाजार समितीचा १९७५-७६ ते १९८८-८९ या कालावधीतील इतर बाबीवरील खर्च ३१,९८९ रुपयांपासून २,०७,८१७ रुपयांपर्यंत वाढलेला आहे. इतर खर्चात या कालावधीत निव्वळ वाढ १,७५,८२८ रुपयांची झालेली आहे. या वाढीचे प्रमाण ८४.६० टक्के आहे. या कालावधीत प्रत्येक वर्षी सरासरी ५१.०२ टक्के दराने इतर बाबीवरील खर्चात वाढ झालेली आहे.

इतर बाबीवरील खर्चाचे एकूण खर्चाशी असलेले सर्वाधिक प्रमाण १९८२-८३ या वर्षात ६४.८४ टक्के होते, तर सर्वात कमी प्रमाण १९८८-८९ मध्ये ४३.८५ टक्के आहे.

विश्लेषण कालखंडात इतर खर्चाचे एकूण खर्चाशी असलेले प्रमाण ४३.८५ टक्के पासून ते ६४.८४ टक्के पर्यन्त वाढलेले आहे. त्यात निव्वळ वाढ २०.९९ टक्के झालेली दिसून येते.

४.५.३ एकूण खर्च :

बाजार समितीच्या कार्यालयीन खर्च आणि इतर खर्च याचा समावेश एकूण खर्चात केलेला आहे. १९७५-७६ ते १९८८-८९ या विश्लेषणाच्या कालावधीत एकूण खर्चात झालेला बदल याचा तपशील कोष्टक क्रमांक ४.८ मध्ये स्पष्ट करण्यात आलेला आहे.

१९७५-७६ ते १९८८-८९ या कालावधीत एकूण खर्च ५६,८७९ रूपयांवरून ४,७४,००० रूपयांपर्यन्त वाढलेला आहे. या कालावधीत एकूण खर्चात निव्वळ वाढ ४,१७,१२१ रूपयांची झालेली आहे. प्रत्येक वर्षी सरासरी एकूण खर्चात सरासरी ८८.०० टक्के वाढ झालेली आहे. १९८४-८५ आणि १९८८-८९ ही वर्षे अपवाद वगळता मागील वर्षांच्या तुलनेने इतर सर्व वर्षी एकूण खर्चाच्या वाढीत सातत्य दिसून येते.

वडूज कृषि उत्पन्न बाजार समितीचे उत्पन्न व खर्च लक्षात घेतल्यास या बाजारपेठेने अभ्यासाच्या कालावधीत अर्थक्षमतेची पातळी पूर्ण केलेली दिसून येते. कारण १९६७ मध्ये महाराष्ट्रात लागू करण्यात आलेल्या कायद्यानुसार बाजार समितीच्या उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ बसावयाचा असल्यास बाजारपेठेतील वार्षिक उलाढाल किमान १ कोटी रूपयांची होणे आवश्यक आहे. हा निकष लावल्यास वडूज कृषि उत्पन्न बाजार समितीतील शेतमालाची उलाढाल समाधानकारक आहे असे म्हणता येईल.

## कोष्टक क्र. ४.८

## वडूज कृषि उत्पन्न बाजार समितीचा खर्च

| वर्ष | कार्यालयीन खर्च | इतर खर्च | एकूण खर्च |
|---|---|---|---|
| १९७५-७६ | ३४८९० | ३११८१ | ५६८७१ |
| | (४३.७५) | (५६.२५) | (१००.००) |
| १९७६-७७ | ३२३४५ | ३५७७५ | ६८१२० |
| | (४७.४८) | (५२.५२) | (१००.००) |
| १९७७-७८ | ३९१०७ | ५५७७६ | ९५६८६ |
| | (४१.७०) | (५८.३०) | (१००.००) |
| १९७८-७९ | ४३३६८ | ५०३५५ | ९७७२३ |
| | (४८.४७) | (५१.५३) | (१००.००) |
| १९७९-८० | ५९४७० | ७६५२९ | १३५९९९ |
| | (४३.७२) | (५६.२८) | (१००.००) |
| १९८०-८१ | ६६९८६ | ९३८५४ | १६०८४० |
| | (४१.६४) | (५८.३६) | (१००.००) |
| १९८१-८२ | ८२३११ | ११८७४० | २०१०५१ |
| | (४०.९५) | (५९.०५) | (१००.००) |
| १९८२-८३ | ९४७४४ | १७४७११ | २६९४५५ |
| | (३५.१६) | (६४.८४) | (१००.००) |
| १९८३-८४ | १०५२२८ | २०१११४ | ३०७१४२ |
| | (३४.२६) | (६५.७४) | (१००.००) |
| १९८४-८५ | १७३४३८ | १५९५०९ | ३३२९४७ |
| | (५२.०९) | (४७.९१) | १००.००) |
| १९८५-८६ | १९८२४१ | १८१९९९ | ३८०२४० |
| | (५२.१३) | (४७.८७) | (१००.००) |

कोष्टक क्र.४.८ (पुढे चालू....)

| वर्ष | कार्यालयीन खर्च | इतर खर्च | एकूण खर्च |
|---|---|---|---|
| १९८६-८७ | २०५३७१<br>(४९.७५) | २०७४१० <br>(५०.२५) | ४१२७८१<br>(१००.००) |
| १९८७-८८ | २४१४४१<br>(५०.५२) | २३६४५०<br>(४९.४८) | ४७७८९१<br>(१००.००) |
| १९८८-८९ | २६६१८३<br>(५६.१५) | २०७८१७<br>(४३.८५) | ४७४०००<br>(१००.००) |

टीप : कंसातील आकडे त्या विशिष्ट खर्चाचे एकूण खर्चाशी असलेले शेकडा प्रमाण दर्शवितात.

संदर्भ : वडूज कृषि उत्पन्न बाजार समिती, वार्षिक अहवाल, १९७५ ते १९८९.

## ४.६ वडूज बाजार समितीचा निव्वळ नफा :

वडूज बाजार समितीचा विश्लेषण काळातील खर्च हा एकूण उत्पन्नापेक्षा कमी असल्यामुळे निव्वळ नफा प्राप्त झाला आहे. १९७५-७६ ते १९८८-८९ या काळात १९८७-८८ वर्ष वगळता नफ्याच्या रकमेत सातत्याने वाढ झालेली आहे.


बाजार समितीस मिळालेल्या निव्वळ नफ्याचा तपशील खालील कोष्टकात स्पष्ट केलेला आहे.

UNIVERSITY KOLHAPUR

## आलेख क्रमांक ४.१

### वडूज बाजार समितीचे उत्पन्न आणि खर्च:

प्रमाण
अ य अक्ष - ३ से.मी. = १ लाख रुपये
अक्ष अक्ष - १ से.मी. = १ वर्ष




आधार:- कोष्टक क्रमांक ४.८

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

कोष्टक क्र. ४.९

वडूज बाजार समितीचा निव्वळ नफा (रुपये)

| वर्ष | एकूण उत्पन्न | निव्वळ नफा | एकूण उत्पन्नाशी नफ्याचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १९७५-७६ | ७७९८१ | २०३०२ | २६.३१ |
| १९७६-७७ | ९२२३९ | २४११९ | २६.१४ |
| १९७७-७८ | ११३९९८ | १८३११५ | १६.०७ |
| १९७८-७९ | १३२७५२ | ३५०२९ | २६.३९ |
| १९७९-८० | २०१७१८ | ६५७१९ | ३२.५८ |
| १९८०-८१ | २३२७५० | ७१९१० | ३०.९० |
| १९८१-८२ | ३०३५२० | १०२४६९ | ३३.७७ |
| १९८२-८३ | ३७०९६१ | १०१५०६ | २७.३७ |
| १९८३-८४ | ४५४१९० | १४७५०६ | ३२.४८ |
| १९८४-८५ | ५०५३४२ | १७३०९५ | ३४.२६ |
| १९८५-८६ | ४८२१४८ | १०११०८ | २१.१४ |
| १९८६-८७ | ६११५०६ | १९८७२५ | ३२.४९ |
| १९८७-८८ | ५१४९६९ | ३७००७८ | ०७.२१ |
| १९८८-८९ | ६११२११ | १३७२११ | २२.४५ |

संदर्भ : वडूज कृषि उत्पन्न बाजार समिती, वार्षिक अहवाल. १९७५-७६ ते १९८८-८९.


सदरच्या कोष्टक क्र. ४.९ वरून निदर्शनास येते की, १९७५-७६ ते १९८८-८९ या विश्लेषण कालावधीत बाजार समितीच्या एकूण उत्पन्नातील बदलाबरोबर एकूण नफ्यात ही बदल झाल्याचे स्पष्ट होते. १९७५-७६ मध्ये

आलेख क्रमांक ४.२

लातूर बाजार समिती नफा (रुपये)

प्रमाण :
अय अक्ष – १ से.मी. = १५००० रुपये
अक्ष अक्ष – १ से.मी. = १ वर्ष.

नफा स्तंभालेख




आधार : तक्ता क्र. ४.१

वडूज बाजार समितीला प्राप्त झालेला नफा २०३०२ रुपये होता. तो १९८८-८९ या वर्षी १३७२११ रुपयेपर्यन्त वाढला. या कालावधीत बाजार समितीच्या निव्वळ नफ्यात ११६९०९ रुपये निव्वळ वाढ झाली. ही वाढ ८५.२० टक्के झालेली आहे. या कालावधीत नफ्याच्या रक्कमेत प्रतिवर्षी सरासरी ४१.१३ टक्के दराने नफ्यात वाढ झालेली आहे.

विश्लेषण काळात बाजार समितीला सर्वात जास्त नफा १९८६-८७ मध्ये १९८७२५ रुपयांचा झालेला आहे. यावर्षी नफा वाढल्याचे मुख्य कारण म्हणजे वडूज बाजार समितीला १ लाख रुपयांचे शासकीय अनुदान मिळाले. सर्वात कमी नफा १९७७-७८ या वर्षी झाला असून तो १८३१५ रुपये इतका आहे. हा नफा विश्लेषण कालावधीच्या पहिल्या टप्प्यातील असल्याने कमी वाटतो. नंतरच्या कालावधीत काही वर्षे अपवाद वगळता नफा वाढलेला दिसून येतो.

बाजार समितीला मिळणाऱ्या नफ्यात ज्या दराने वाढ झाली आहे त्याच दराने या नफ्याचे एकूण उत्पन्नाशी असलेले प्रमाण वाढलेले दिसून येत नाही.

१९७५-७६ ते १९८८-८९ या कालावधीत नफ्याच्या प्रमाणात कमीत कमी ०७.२१ टक्केपासून ते जास्तीतजास्त ३४.२६ टक्केपर्यन्त वाढ झाल्याचे स्पष्ट होते. विश्लेषण काळात झालेली निव्वळ वाढ २७.०५ टक्के आहे. नफ्याच्या रक्कमेत प्रतिवर्षी २६.३९ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. १९७५-७६ ते १९८८-८९ या कालावधीतील नफ्याचे एकूण उत्पन्नाशी असलेले प्रमाण सातत्याने वाढलेले नाही.

विश्लेषण कालखंडात १९७७-७८, १९८२-८३, १९८५-८६ व १९८७-८८ या कालावधीत वडूज बाजार समितीने विकास कार्याकडे अधिक लक्ष पुरविल्याने आणि सेवा-सुविधांच्या उपलब्धतेसाठी खर्चाचे प्रमाण वाढल्यामुळे

नफा अधिक प्राप्त करता आला नाही. यामुळे मागील वर्षांशी तुलना केल्यास नफ्यात घट झालेली दिसून येते.

१९८८-८९ या वर्षी नफ्याचे एकूण उत्पन्नाशी असलेले प्रमाण २२.४५ टक्के होते. १९८७-८८ या वर्षांशी तुलना करता या प्रमाणात १५.२४ टक्के निव्वळ वाढ झालेली आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, विश्लेषण काळात वडूज बाजार समितीच्या उत्पन्नातील चढ-उताराबरोबर नफ्यातसुध्दा बदल झालेले आहेत.

४.७ कायम स्वरूपाचा निधी :

बाजार समितीला प्राप्त झालेल्या एकूण उत्पन्नातून आवश्यक एकूण खर्च वजा केल्यानंतर जो वाढावा शिल्लक राहतो, तो बाजार समितीच्या सदस्य सभेमध्ये ठराव मान्य करून वाढाव्याची रक्कम कायम स्वरूपी फंडात जमा केली जाते. त्यास कायम स्वरूपाचा निधी असे मानले जाते. बाजार समितीच्या आर्थिक सुरक्षिततेसाठी आणि उन्नतीसाठी त्याचा उपयोग केला जातो. मोठ्या प्रमाणात कायम स्वरूपी निधी उपलब्ध असणे हे बाजार समितीच्या प्रतिष्ठेचे प्रतिक समजले जाते.

खालील कोष्टकात वडूज बाजार समितीचा १९७५-७६ ते १९८८-८९ या कालखंडातील कायम स्वरूपाचा निधी स्पष्ट करण्यात आला आहे.

## कोष्टक क्र. ४.१०

वडूज बाजार समितीचा कायम स्वरूपाचा निधी
(१९७५-७६ ते १९८८-८९)

| वर्ष | कायम स्वरूपाची निधी (रुपये) |
|---|---|
| १९७५-७६ | ४७८१५ |
| १९७६-७७ | ७२०१५ |
| १९७७-७८ | ९०३३० |
| १९७८-७९ | १२५३५९ |
| १९७९-८० | १९१०७७ |
| १९८०-८१ | २९३५७० |
| १९८१-८२ | ४३०८४५ |
| १९८२-८३ | ५८१७५९ |
| १९८३-८४ | ६७७३२१ |
| १९८४-८५ | ८७८१६९ |
| १९८५-८६ | ८८०१९७ |
| १९८६-८७ | १०७८९२२ |
| १९८७-८८ | ११९६००० |
| १९८८-८९ | १२५३२११ |


संदर्भ : वडूज बाजार समिती, माहितीच्या आधारे.

## आलेख क्रमांक ४.३

वडूज कृषि उत्पन्न बाजार समितीचा कायम स्वरूपी निधी रुपये (लाखात)

प्रमाण : अय-अक्ष-१.५ से.मी = १ लाख रुपये.
अक्ष-अक्ष - १ से.मी = १ वर्ष.

का.स्व.निधी स्तंभालेख




आधार :- कोष्टक क्रमांक ४.१०

१९७५-७६ ते १९८८-८९ या विश्लेषण कालावधीत वडूज कृषि उत्पन्न बाजार समितीच्या कायम स्वरूपाच्या निधीत सातत्याने वाढ झालेली आहे. ही वाढ ४७८१५ रूपयांपासून १२५३२११ रूपयांपर्यन्त झालेली आहे. या कालावधीत निधीत १२०५३९६ रूपयांची निव्वळ वाढ झालेली आहे. ही वाढ ९६.१८ टक्के आहे.

कायमस्वरूपी फंडात प्रतिवर्षी वाढ झाल्याचे स्पष्ट होते. परंतु १९८४-८५ या बाजार वर्षात झालेली वाढ इतर सर्व वर्षांच्या वाढीपेक्षा जास्त आहे. ही वाढ २००८४८ रूपयांची आहे. कारण बाजार समितीस या बाजार वर्षात नफा अधिक झालेला होता त्यामुळे त्यांची गुंतवणूक समितीने कायम स्वरूपाच्या निधीत केलेली आहे.

## ४.८ बाजारातील शेतमालाची आवक :

वडूज कृषि उत्पन्न बाजार समितीचे बाजारातील आवकेबद्दलचे कार्य महत्वाचे आहे. समितीकडून पुसेगाव, पुसेसावळी उपबाजार केंद्रांना अनेक प्रकारच्या सोयी, मदत, मार्गदर्शन देण्यात येते. सातारा जिल्ह्यातील अन्य बाजार समित्यांच्या तुलनेने वडूज बाजार समितीतील शेतमालाची आवक मोठ्या प्रमाणात आहे.

कोष्टक क्रमांक ४.११ मध्ये वडूज बाजार समितीतील १९७५-७६ ते १९८८-८९ या कालावधीत दरवर्षी होणारी शेतमालाची आवक दर्शविण्यात आलेली आहे.

या कोष्टकावरून असे स्पष्ट होते की, वडूज बाजार समितीच्या आवारात मुख्यत्वेकरून गूळ, ज्वारी, संकरीत ज्वारी, घेवडा, कापूस, कांदा, धणा, मिरची या उत्पादनाची आवक होते. १९७५-७६ ते १९८८-८९ या

वडूज बाजार समितीतील शेतमालाची आवक (क्विंटलमध्ये)
१९७५-७६ ते १९८८-८९

| अनु. | शेतमालाचा तपशील | १९७५-७६ | १९७६-७७ | १९७७-७८ | १९७८-७९ | १९७९-८० | १९८०-८१ | १९८१-८२ | १९८२-८३ | १९८३-८४ | १९८४-८५ | १९८५-८६ | १९८६-८७ | १९८७-८८ | १९८८-८९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | गूळ | ३३५६१ | ४१६९४ | ४७१६२ | ३६०३९ | २५८१३ | ५३५१८ | ७००२१ | ७५००९ | ५०९५३ | ३३०७१ | २८५९९ | १७२२० | १०७९१ | १७४९० |
| २. | गहू | ४४१ | ४३६ | १६४ | २७५ | २१९ | ८४ | २६ | ५ | ८ | २१ | - | ५ | ११ | ३२ |
| ३. | ज्वारी | ४२ | १२७ | १९ | १६१ | २३ | २६ | ४४ | ९ | ७८ | १०५ | ३२ | ७ | २० | २९ |
| ४. | संकरीत ज्वारी | २२० | ५७९ | २३८ | ६७ | ५१ | २०१ | १४० | ७२ | ५० | - | १२ | - | - | - |
| ५. | बाजरी | ६ | ५ | १२ | २४ | ३० | ११ | ५ | १७ | ९ | - | - | - | - | - |
| ६. | घेवडा | १४४० | ७०८ | ८८० | ९२७ | २५९६ | २८३१ | १३३८ | १४८० | ८३२ | ५१७ | १३०८ | ८०८ | ४२४ | १७९ |
| ७. | चवळी | ५७ | ५२ | २२ | ३ | २७ | १२ | १२२ | ८ | ७ | १ | १७ | २४ | १२ | २ |
| ८. | हरभरा | २५ | १६ | १८ | ४ | २ | २ | २ | - | - | - | - | - | १ | १ |
| ९. | मिरची | ७ | ९ | १३ | ६१ | ५ | २ | १ | ३ | ५ | ७ | ४ | - | - | - |
| १०. | घणा | १५ | १२ | ८ | - | ३ | १३ | २५ | - | - | ५ | ४१ | ३० | ८ | १ |
| ११. | उडीद | ११ | १३ | २१ | - | २ | ३ | १ | - | - | - | - | - | - | - |
| १२. | मूग | ६९ | ३६ | २४ | - | ३८ | ६७ | ३४२ | ४० | २४ | ८ | २६ | २५ | - | - |
| १३. | कापूस | १३ | - | - | १७२८ | ७२३४ | ७६२३ | ५४५८ | २७६४ | १४१ | - | - | - | १४२६ | - |
| १४. | कांदा | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | २५४२ | २११४ |
| | एकूण आवक : | ३५९०७ | ४३६८७ | ४८५८१ | ३९२८९ | ३६०४४ | ६४३९३ | ८१५६५ | ७९४०७ | ५२१०७ | ३३७३५ | ३००३९ | १८१२९ | १५१५५ | १९८३८ |


संदर्भ : वडूज कृषि उत्पन्न बाजार समिती, वार्षिक अहवाल, १९७५-७६ ते १९८८-८९.

आलेख क्रमांक ४.४

वडूज बाजार समितीतील शेतमालाची आवक (क्विंटल)

प्रमाण ; अ य अक्ष – १ से.मी. = ५०० क्विंटल
अक्ष अक्ष – १ से.मी. = १ वर्ष

आवक वक्र




आधार ; तक्ता क्र. ४.११

कालावधीत सर्वात अधिक आवक १९८१-८२ या वर्षी ८१५६५ क्विंटल झालेली आहे. तर सर्वात कमी आवक १९८७-८८ मध्ये १५१५५ क्विंटल झालेली आहे.

वडूज बाजार समितीच्या शेतमालाच्या आवकेविषयी असे जाणवते की, दिवसेंदिवस आवकेमध्ये वाढ होण्याऐवजी मोठया प्रमाणात घट होत आहे. शेती उत्पादनाच्या वाढत्या किंमतीमुळे समितीचे उत्पन्न सतत वाढत असले तरी आवक मात्र कमी होत आहे आणि ही बाब बाजार समिती आणि उत्पादक विक्रेते यांच्या दृष्टीने अहितकारक आहे. प्रामुख्याने अल्प विक्रीयोग आधिक्य, फिरते व्यापारी, दलाल, स्थानिक बाजार व आठवडी बाजारात शेतमालाची विक्री, वाहतुकीची गैरसोय व आर्थिक दुबळेपणा, माहितीचा अभाव यामुळे बाजार समितीच्या आवारात शेतमालाची आवक जास्त होत नाही.

## का तक्ता क्र. ४.१२

## बाजार समितीतील शेतमालाची एकूण आवक व किंमत

| वर्ष | एकूण आवक (क्विंटल) | एकूण किंमत (रुपये) | एकूण शेतमाला आवकेतील बदल |
|---|---|---|---|
| १९७५-७६ | ३५९०७ | ६२०६५९९ | - |
| १९७६-७७ | ४३६८७ | ७८५६४५८ | २९.६७ |
| १९७७-७८ | ४८५८१ | ६४१५९७९ | १०.०७ |
| १९७८-७९ | ३९२८९ | ५१६८०८४ | - २३.६५ |
| १९७९-८० | ३६०४४ | ११४४४६९० | - ०९.०० |
| १९८०-८१ | ६४३९३ | २२७७४५८६ | ७८.६५ |
| १९८१-८२ | ८१५६५ | २०५९८८६९ | २१.०५ |
| १९८२-८३ | ७९४०७ | १०५८५९४४ | २.११ |
| १९८३-८४ | ५२१०७ | १७०५१००१ | - ४०.८७ |
| १९८४-८५ | ३३७३५ | १०९१८८१५ | - ५४.४५ |
| १९८५-८६ | ३००३९ | ११५००७४७ | - १२.३० |
| १९८६-८७ | १८१२९ | १५२३२८५६ | - ६५.८१ |
| १९८७-८८ | १५१५५ | ५५१०४४६७ | - १९.७४ |
| १९८८-८९ | १९८३८ | ७५८१८६२ | २३.७३ |

संदर्भ : वडूज बाजार समिती, वार्षिक अहवाल, १९७५-७६ ते १९८८-८९.

४.९ बाजार किंमती :

शेती उत्पादनाच्या किंमती किंवा किंमत विषयक धोरण बाजार समितीच्या विकासासाठी आवश्यक असते. कृषि विपणन व्यवस्था सुलभ आणि यशस्वी होण्यासाठी शेतमालास योग्य किंमत मिळणे क्रमप्राप्त ठरते. शेतमालास योग्य किंमती मिळत असतील तर ग्राहक, उत्पादक, वर्गांचे हित साध्य होते. शिवाय शेती विकासाच्या नवीन योजनांना प्रेरणा मिळते, त्यामुळे भविष्यकाळात कृषि उत्पादन व विपणन व्यवस्थेवर अनुकूल परिणाम होतो. शेतमालाच्या किंमती अधिक कमी किंवा जास्तीतजास्त असणे उत्पादनाच्या दृष्टिकोनातून हानिकारक ठरते.

प्रामुख्याने बाजारातील शेतमालाच्या किंमती शेतमालाची मागणी व पुरवठा यावर अवलंबून असतात. वडूज कृषि उत्पन्न बाजार समितीतील १९७५-७६ ते १९८८-८९ या कालावधीतील विविध शेतमालाच्या किंमती पुढील कोष्टकात दिलेल्या आहेत.

कोष्टक क्रमांक ४.१३ वरून असे स्पष्ट होते की, १९७५-७६ ते १९८८-८९ या काळात सर्वच शेतमालाच्या किंमतीत वाढ झालेली आहे. गुळाची किंमत १९७५-७६ मध्ये ३४० रूपये होती त्यामध्ये १९० रूपयेपर्यन्त घट होऊन पुन्हा १९८८-८९ मध्ये किंमत ५५० रूपयापर्यन्त वाढलेली आहे. तर घेवड्याची किंमत प्रतिक्विंटल २०० रूपयांवरून १०५० रूपयांपर्यन्त वाढली आहे. अन्नधान्याच्या किंमतीच्या तुलनेने नगदी उत्पादनाच्या किंमतीतील वाढ अधिक आहे.

कोष्टक क्र. ४.१२ च्या आधारे १९७५-७६ मधील एकूण आवक झालेल्या शेतमालाची एकूण किंमत ६२०६५९९ रूपये इतकी होती. तर १९८८-८९ मध्ये एकूण आवक असलेल्या शेतमालाची एकूण किंमत ७५८१८३२ रूपये झाली. सर्वात अधिक किंमत १९८१-८२ या वर्षी २२७७४५८६ रूपये इतकी होती.

कोष्टक क्र. ४.१३

वडूज कृषि उत्पन्न बाजार समितीतील शेतमालाच्या किंमती (१९७५-७६ ते १९८८-८९)

(प्रती क्विंटल रूपये)

| अनु. | शेतमालाचे नाव | १९७५-७६ | १९७६-७७ | १९७७-७८ | १९७८-७९ | १९७९-८० | १९८०-८१ | १९८१-८२ | १९८२-८३ | १९८३-८४ | १९८४-८५ | १९८५-८६ | १९८६-८७ | १९८७-८८ | १९८८-८९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | गूळ | ३४० | १९० | १९० | २०० | २५० | ३०० | ३५० | २०० | ३०० | ३२५ | ३३० | ३५५ | ४२५ | ५५० |
| २. | ज्वारी देशी | १६० | १६० | १५० | १२० | १६० | १७० | २०० | २२० | २१० | २२० | १९० | २५० | २७५ | ३१० |
| ३. | ज्वारी संकरीत | ९० | ९० | १०० | ९० | १०५ | १०५ | १५० | १४० | १५० | १५० | १६० | १८० | १९० | २१० |
| ४. | बाजरी | १६० | १६० | १५० | १२० | १६० | १७० | २०० | २२० | २१० | २२० | १९० | २५० | २४० | २६० |
| ५. | तांदूळ | २५० | २५० | २५० | २५० | २५० | २४० | २५० | २६५ | ३०० | ३५० | ३५० | ४०० | ४५० | ४५० |
| ६. | शेंगदाणा | ५२० | ५२० | ५०० | ५२५ | ५५० | ५५० | ६०० | ६०० | ५५० | ९०० | १००० | ११०० | १२०० | १३५० |
| ७. | डाळी | २०० | २१० | २५० | ४०० | ४०० | ५०० | ५०० | ५५० | ५५० | ५०० | ७०० | ७५० | ८५० | १००० |
| ८. | मिरची | ८०० | ८०० | ६५० | ६४० | ७५० | ७०० | ९५० | ८५० | ७०० | १५०० | ८०० | १००० | २४०० | २२०० |
| ९. | घेवडा | २०० | २५० | ४५० | ४०० | २५० | २५० | ३५० | ४०० | ३०० | ६०० | ५२० | ५५० | ३०० | १०५० |
| १०. | साखर | २७५ | ३०० | ३०० | ३०० | ३५० | ३५० | ३५० | ३५० | ४०० | ४०० | ६०० | ६५० | ६५० | ७०० |


संदर्भ : वडूज कृषि उत्पन्न बाजार समिती, माहितीच्या आधारे.

## आलेख क्रमांक . ४.५

वडूज बाजार समितीतील ज्वारी घेवडा व गूळ यांच्या किंमतीतील वाढ.

प्रमाण : अ य – अक्ष – १से.मी = १०० रुपये

अ क्ष – अक्ष – निवडित वर्षे




आधार :- कोष्टक क्रमांक ४.१३.

४.१० प्रतवारी :

कृषि उत्पादन बाजार समितीच्या कामकाजातील जी प्रमुख कर्तव्ये कायद्याने ठरवून दिलेली आहेत. त्यापैकी शेतमालाची प्रतवारी ठरविणे हे महत्वाचे कार्य आहे. वडूज बाजार समितीने १९८७- पासून कापूस व कांदा या उत्पादनासाठी ही योजना अंमलात आणली आहे. सध्या वडूज बाजार पेठेत कापूस आणि कांदा यांची प्रतवारी केली जाते. शासनाने उपविधी १२ (३) नुसार प्रतवारी शुल्क आकारण्यास बाजार समितीस मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार शेकडा ५ पैसे प्रतवारी शुल्क आकारण्यास प्रारंभ केला व बाजार समितीला उत्पन्नाचा एक नवीन मार्ग मिळाला. प्रतवारी शुल्क उत्पादकाकडून घेतले जाते. या शुल्काचा प्रधान हेतू उत्पन्न मिळविणे नसून प्रतवारीचे काम अधिक चांगल्या प्रकारे करणे हा आहे.

वडूज बाजार समितीला प्रतवारी शुल्कापासून मिळणा-या उत्पन्नाचे स्पष्टीकरण तक्ता क्रमांक ४.१४ मध्ये केलेले आहे.

तक्ता क्र. ४.१४

वडूज बाजार समितीचे प्रतवारी उत्पन्न

| वर्ष | शेतमालाचा प्रकार | वजन (क्विंटल) | किंमत रुपये | उत्पन्न रुपये |
|---|---|---|---|---|
| १९८७-८८ | कापूस | १४३७ | ७७७८८६ | ३८९.०० |
| १९८८-८९ | कांदा | २१५० | २१५००० | १०५.५० |

संदर्भ : वडूज बाजार समिती, वार्षिक अहवाल, १९८७-८८, १९८८-८९.

या तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, वडूज बाजार समितीद्वारे अगदी अल्प प्रमाणात शेतमालाची प्रतवारी झालेली आहे.

१९८७-८८ मध्ये प्रतवारी शुल्कापासून ३८९.०० रूपये प्राप्त झाले तर १९८८-८९ मध्ये १०७.५० इतके अल्प उत्पन्न मिळाले आहे.

४.११ वाहतुकीच्या सोयी :

कृषि विपणन व्यवस्थेत वाहतुकीच्या सेवा-सुविधा महत्वाच्या असतात. शेती उत्पादित माल शेतापासून घरापर्यन्त आणि घरापासून बाजारपेठांपर्यन्त पोहोचविणे अत्यंत आवश्यक असते. या वाहतूक साधनात ट्रक, ट्रॅक्टर, बैलगाडी वगैरे साधनांचा समावेश होतो.

वडूज बाजार समितीने शेती उत्पादकांना कोणत्याही प्रकारच्या वाहतूक साधनांची सोय उपलब्ध केलेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना अनेक समस्या भेडसावत असतात. प्रामुख्याने फळे, भाजीपाला या सारख्या नाशवंत शेतमालाच्या विक्रीत अडचणी येऊन उत्पादकांना आर्थिक झळ सहन करावी लागते.

बाजार समितीच्या आवारात आणि कार्यक्षेत्रात होणारी शेतमालाची आवक आणि साधने याचे विवेचन खालील तक्त्याच्या आधारे केलेले आहे.

तक्ता क्र. ४.१५

शेतमालाची आवक व साधनाचा प्रकार

| अनु. | साधनाचा प्रकार | एकूण आवकेशी असलेले शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १. | बैलगाडी | ५० |
| २. | ट्रॅक्टर | ३० |
| ३. | ट्रक | २० |

संदर्भ : वडूज बाजार समिती, माहितीआधारे

सदरच्या तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, बाजार समितीच्या आकारात व कार्यक्षेत्रात शेतमालाची आवक सुमारे ५० टक्के बैलगाडी सहाय्याने होते. सहाजिकच यावरून शेतीची प्रगती, शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती यांची कल्पना येऊ शकेल.

४.१२ शेतमालाचे वजन :

शेती उत्पन्न खरेदी-विक्री (विनियमन) अधिनियम १९६३ या कायद्यामध्ये शेती उत्पादित मालाच्या विपणन व्यवहारासाठी प्रमाणित आणि योग्य वजनमापांचा अवलंब करण्यात यावा, अशी कायदेशीर तरतूद आहे. शेतमालाचे योग्य वजन करणे, उत्पादक शेतकरी, व्यापारी आणि खरेदीदार यांच्या हिताचे असते. प्रामुख्याने शेतमालाचे लिलाव संपल्यानंतर परवानाधारक तोलणार व्यक्तीकडून शेतमालाचे वजन केले जाते. त्यावर बाजार समितीतील निरीक्षक, पर्यवेक्षक यांचे नियंत्रण असते. शेतमालाच्या वजनानंतर उत्पादक शेतकरी आणि बाजार समिती यांना वजना संदर्भात पावती देण्यात येते.

शेतमालाचे वजन करतेवेळी, प्रतिक्विंटल २ ते ३ किलो घट अपेक्षित धरली जाते. बाजार कायद्यामध्ये तसा उल्लेख आहे पण काही प्रामाणिक उत्पादक शेतकऱ्यांना त्याची हानी बसते. म्हणून ही तरतूद योग्य वाटत नाही.

४.१३ गोदाम व्यवस्था :

शेतमालाच्या उत्पादनातील बदलांना सामोरे जाण्यासाठी आणि शेतमालाच्या मागणी पुरवठयामध्ये समतोल निर्माण करून ग्राहकांना योग्य वितरण व्हावे या दृष्टिकोनातून साठवणूक व्यवस्था महत्वाची ठरते.

साठवणूक सोयींच्या उपलब्धतेनुसार शेतमालाची साठवणूक, सुरक्षितता, तारण कर्ज असे लाभ प्राप्त होतात. शेती उत्पादनाच्या स्वरूपानुसार विविध प्रकारची साठवणूकगृहे उपलब्ध आहेत. उदा. फळे, भाजीपाला यासाठी शीतगृहे इत्यादी. साठवणूकगृहे ही सरकारी, सहकारी संस्था, खाजगी व्यक्ती आणि महामंडळे यांच्या मालकीची आहेत. प्रामुख्याने शेतमालाचे, संरक्षण, वाहतुकीची सुलभता आणि गरजेनुसार कर्जपुरवठा या साठवणूक सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत.

भारत सरकारने १९५७ मध्ये मध्यवर्ती गोदाम महामंडळाची स्थापना केल्याने आणि राज्य पातळीवरील राज्य वखार (गोदाम) महामंडळाच्या निर्मितीमुळे साठवणूक सेवा-सुविधांचा विस्तार झालेला आहे.

वडूज बाजार समितीने मुख्य बाजार आवाराच्या ठिकाणी ५०० मे. टन क्षमतेचे ३७२१४१ रूपये खर्च करून गोदाम बांधलेले आहे. शिवाय पुसेगाव आणि पुसेसावळी उपबाजार केंद्राच्या ठिकाणी प्रत्येकी २०० मे.टन साठवणूक क्षमता असलेली अनुक्रमे ३०५०९८ व ४१४००० रूपये खर्च करून गोदामे बांधण्यात आलेली आहेत.

१९८४-८५ पर्यन्त समितीकडे साठवणुकीची सोय उपलब्ध नव्हती. गोदाम नोंदणी फी आणि भाडे या स्वरूपात प्राप्त झालेल्या उत्पन्नाचा खुलासा पुढील तक्त्यात केलेला आहे.

तक्ता क्र. ४.१६

गोदाम फीपासून समितीस मिळालेले उत्पन्न

| वर्ष | गोदाम फी (रुपये) | एकूण उत्पन्नाशी शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १९८५-८६ | ३३३०० | ६.९० |
| १९८६-८७ | ३१८९३ | ५.२१ |
| १९८७-८८ | ३२३६४ | ६.२८ |
| १९८८-८९ | २४७३७ | ४.०४ |

संदर्भ : वडूज बाजार समिती, वार्षिक अहवाल १९८५ ते १९८९.

सदरच्या तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, वडूज बाजार समितीच्या एकूण उत्पन्नातील गोदाम फी पासून मिळणारा हिस्सा अगदीच अल्प आहे. १९८५-८६ ते १९८८-८९ या कालाचा विचार करता सर्वात जास्त गोदाम फी ३३३०० रुपये १९८५-८६ मध्ये प्राप्त झाली असून एकूण उत्पन्नातील हिस्सा ६.९० टक्के इतका आहे. तर १९८८-८९ मध्ये गोदाम फीपासून मिळालेले उत्पन्न २४७३७ रुपये इतके असून सदर वर्षाच्या एकूण उत्पन्नातील हिस्सा ४.०४ टक्केपर्यन्त कमी झालेला आहे.

यावरून असे सूचित होते की, गोदाम व्यवस्थेच्या वापरात हंगामानुसार आणि उत्पादनातील चढउतारानुसार बदल होतात. त्यामुळे गोदाम फीपासून प्राप्त होणारे उत्पन्न आणि त्याचे एकूण उत्पन्नाशी असलेले शेकडा प्रमाण कमी अधिक होत आहे.

४.१४ जाहिरात :

विपणन प्रक्रियेत जाहिरातीला महत्व असल्यामुळे आधुनिक युगास जाहिरातीचे युग संबोधले जाते. उत्पादनाच्या विक्रीसाठी प्रसिध्दी, माहिती, सूचना असणे अत्यंत महत्वाचे असते. जाहिरातीसाठी आकाशवाणी, टेलिव्हिजन, फिल्म, वृत्तपत्रे या माध्यमांचा वापर करण्यात येतो. परंतु वडूज कृषि उत्पन्न बाजार समितीने जनावरे यात्रा, प्रदर्शन, मासिके या माध्यमाद्वारे जाहिरात केलेली आहे.

बाजार समितीने १९७५-७६ ते १९८८-८९ या कालावधीत जाहिरातीवर केलेला खर्च आणि त्याचे एकूण खर्चाशी असलेले शेकडा पमाण याचे स्पष्टीकरण खालील कोष्टकात दिलेले आहे.

कोष्टक क्र. ४.१७

वडूज बाजार समितीचा जाहिरातीवरील खर्च

| वर्ष | जाहिरातीवरील खर्च रुपये | एकूण खर्चाशी शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १९७५-७६ | ११२९ | ३.३९ |
| १९७६-७७ | २२४५ | ३.२९ |
| १९७७-७८ | २५६० | २.६६ |
| १९७८-७९ | ४४६१ | ४.५६ |
| १९७९-८० | ४२९८ | ३.१६ |
| १९८०-८१ | ४७६५ | २.९६ |
| १९८१-८२ | ५२३८ | २.६० |
| १९८२-८३ | ६५८० | २.४४ |
| १९८३-८४ | ७९७५ | २.६० |
| १९८४-८५ | ८१५३ | २.२६ |
| १९८५-८६ | ८६१२ | २.२६ |
| १९८६-८७ | १०४०७ | २.५२ |
| १९८७-८८ | १६१७७ | २.३८ |
| १९८८-८९ | १३५३२ | २.८५ |

संदर्भ : वडूज कृषि उत्पन्न बाजार समिती माहितीच्या आधारे.

सदरच्या कोष्टक क्र. ४.१७ वरून असे निदर्शनास येते की, वडूज बाजार समितीने १९७५-७६ ते १९८८-८९ या कालावधीत जाहिरातीवर एकूण उत्पन्नातील अल्प खर्च केलेला आहे. १९७५-७६ मध्ये १९२९ रुपये तर १९८८-८९ मध्ये १३५३२ रुपये खर्च करण्यात आलेले आहेत याचे एकूण उत्पन्नाशी शेकडा प्रमाण अनुक्रमे ३.२९ व २.८५ इतके आहे. सर्वात अधिक खर्च १९८७-८८ मध्ये करण्यात आला असून त्याची रक्कम १६१७७ इतकी आहे. बाजार समितीच्या जाहिरातीवरील खर्च दरवर्षी २.५७ टक्के इतका आहे.

४.१५ जनावरांचे खरेदी-विक्री व्यवहार :

वडूज बाजार समितीचे विशेष कार्य म्हणजे आठवडी बाजारातील जनावरांच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार होय. बाजार समितीस जनावरांची ` प्रवेश फी ` या स्वरूपात उत्पन्न प्राप्त होते. प्रामुख्याने वडूज, औंध, पुसेगाव, पुसेसावळी, कलेढोण या साप्ताहिक बाजाराच्या ठिकाणी जनावरांच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार होतात. गायी, बैल, म्हैस, रेडे अशा जनावरांचे व्यवहार फक्त बाजार समितीच्या मुख्य आवाराच्या ठिकाणी वडूजमध्ये होतात.

खालील तक्त्यात वडूज बाजार समितीतील शेतमाल व जनावरांच्या खरेदी-विक्री व्यवहारविषयक फीचे दर नमूद केलेले आहेत.

तक्ता क्र. ४.१८

नियमित शेतमालावरील बाजार फी, सुपरव्हिजन फी व सांदाकण फीचे दर

| अनु. | शेतमालाचा प्रकार | परिमाण | बाजार फी | सुपरव्हिजन फी | सांदाकण फी प्रत्येकी | कोणाकडून |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | शेतमालावरील | १०० रुपयास | ०-५० | ०.०५ | | |
| २, | जनावरे | १०० रुपये अगर त्याच्या भागास ५०० रुपये पर्यन्त | १-०० | ०.०५ | ०.०५ | खरेदीदाराकडून |
| | | ५०० रुपयेच्या पुढे | ०-५० | ०.०५ | ०.०५ | ,, |
| ३. | शेळ्या-मेंढ्या | १०० रुपये अगर त्याच्या भागास | ०-५० | ०.०५ | ०.५० | ,, |

संदर्भ : वडूज बाजार समिती, वार्षिक अहवाल, १९७५-७६ ते १९७९-८०.

खालील कोष्टकाच्या आधारे बाजार समितीच्या आवारात १९७५-७६ ते १९८८-८९ या कालावधीत जनावरांची झालेली आवक आणि खरेदी-विक्री व्यवहारातून प्राप्त झालेले उत्पन्न यांचा खुलासा करण्यात आला आहे.

कोष्टक क्र. ४.११

बाजार समितीच्या आवारातील जनावरांची आवक आणि प्राप्त झालेले उत्पन्न

| वर्ष | जनावरांची आवक | मिळालेले उत्पन्न (रुपये) |
|---|---|---|
| १९७५-७६ | १६९४६ | ८२६ |
| १९७६-७७ | १८३४१ | ८७२ |
| १९७७-७८ | २११२६ | ९८५ |
| १९७८-७९ | २११७६ | १०३८ |
| १९७९-८० | १८७८४ | ११४५ |
| १९८०-८१ | उ.ना. | - |
| १९८१-८२ | २२२१६ | ३२५९ |
| १९८२-८३ | उ.ना. | - |
| १९८३-८४ | २८८८७ | ४१५० |
| १९८४-८५ | २६७७४ | ६४२८ |
| १९८५-८६ | उ.ना. | - |
| १९८६-८७ | उ.ना. | - |
| १९८७-८८ | ३३२२५ | ६९०७ |
| १९८८-८९ | ३१४१६ | ७८३२ |

टीप : उ.ना. - उपलब्ध नाही.

संदर्भ : वडूज बाजार समिती, माहितीच्या आधारे.

सदरच्या कोष्टकावरून असे निदर्शनास येते की, १९७५-७६ मध्ये १६९४६ जनावरांची आवक होऊन बाजार समितीला प्रवेश फीपासून ८२६ रुपये उत्पन्न प्राप्त झाले होते. तर १९८८-८९ मध्ये जनावरांची आवक जवळजवळ २ पट म्हणजे ३१४१६ पर्यन्त वाढली आणि बाजार समितीला ७८३२ रुपये उत्पन्न प्राप्त झालेले आहे. या उत्पन्नात १९७५-७६ शी तुलना करता ९ पट पेक्षा अधिक वाढ झाल्याचे दिसून येते.

प्रामुख्याने जनावरांच्या पैदासीचे प्रमाण वाढल्याने आणि जनावरांच्या किंमतीत मोठ-मोठाले बदल झाल्यामुळे एकूण आवक व उत्पन्न वाढले आहे.